REGISTERED No. B. 3434

अर्थशास्त्र, व्यापार, उद्योगधंदे, बँकिंग, सहकार, इत्यादि विषयांस वाहिलेलें एकमेव मराठी साप्ताहिक
स्थापना : १९३५

# अर्थ

प्रत्येक बुधवारीं प्रसिद्ध होतें.
वर्गणीचे दर :
वार्षिक : ६ रु.
सहामाही : ३ रु.
किरकोळ : २ आ.
दुर्गाधिवास, पुणें ४.

" अर्थ एव प्रधानः " इति कौटिल्यः अर्थमूलौ धर्मकामाविति । —कौटिलीय अर्थशास्त्र

वर्ष १६ पुणें, बुधवार तारीख १३ सप्टेंबर, १९५० अंक ३७

॥ श्री ॥

## दि बृहन्महाराष्ट्र शुगर सिंडिकेट लिमिटेड, पुणें २.

---

१००० टनांच्या नवीन मशिनरीच्या उभारणीकरितां बँकेकडून कॅश क्रेडिट घेण्यापेक्षां, बँकेच्याच ६ टक्के व्याजाच्या दरानें एक वर्ष मुदतीच्या प्रत्येकीं फक्त एक हजार रुपयांच्या ठेवी कंपनीचे भागीदार, ठेवीदार व हितचिंतक यांचेकडून कंपनी हल्लीं स्वीकारीत आहे.

फॉर्म व माहितीसाठीं खालील पत्त्यावर लिहावें:—

पत्ता:—

९९०, सदाशिव पेठ,
कॉमनवेल्थ बिल्डिंग,
लक्ष्मी रोड, पुणें २.
दि. ११-७-१९५०

चंद्रशेखर गोविंद आगाशे,
बी. ए., एलएल. बी.
सी. जी. आगाशे आणि कंपनी
मॅनेजिंग एजंटस.

दळणाच्या चक्क्या—टूल ग्राइंडर्स
मशीन टूल्स
कडया कापण्याचीं यंत्रें—करवत मशीन्स.
या मालाबद्दल आमचेकडे चौकशी करण्यास विसरूं नका.
केळकर बंधू, लक्ष्मी रोड, पुणें शहर.

# विविध माहिती

**कोळसा द्या व तांदूळ घ्या**—पाकिस्तान सरकारनें आसाममधील संकटग्रस्त लोकांना मदत म्हणून १०,००० टन तांदूळ सरकारला देऊं केला आहे. ह्याशिवाय भारताकडून कोळसा घेऊन त्याच्या बदली अधिक तांदूळ देण्याची तयारीही पाकिस्तान सरकारनें दाखविली आहे. आसाममधील सध्याची अन्नधान्याची टंचाई लक्षांत घेऊन भारत सरकारनें पूर्व-बंगालकडील तांदूळ घेऊन कोळसा द्यावा अशी सूचना आसाम सरकारनें केली आहे.

**रशियांत दोन विजेचीं केंद्रें**—सोव्हिएट रशियानें कुशविशेव्ह आणि स्टॅलिनग्रॅड या दोन ठिकाणीं पाण्यापासून वीज निर्माण करणारीं दोन केंद्रें बांधण्याचें ठरविलें आहे. कुशविशेव्ह येथील केंद्र जगांतील सर्वांत मोठें होणार आहे. स्टॅलिनग्रॅडजवळील केंद्राच्या बांधणीस १९५१ मध्यें सुरवात होऊन १९५६ च्या सुमारास तें पुरें होईल. दोन्हीं अणुशक्तीच्या उत्पादनासाठी बांधण्यांत येत असावींत.

**प्रचारासाठी मोफत रेडिओ**—अमेरिकन सरकार त्याच्या दृष्टीनें 'नाजूक' असलेल्या देशांतून २०,००,००० रेडिओ सेटस मोफत वाटण्याचा विचार करीत आहे. त्यापैकीं ५०,००० सेट्स रशिआच्या कक्षेंतील पूर्व युरोपांतील देशांतून पाठविण्यांत येणार आहेत. रशिआच्या प्रचार मोहिमेला उत्तर म्हणून अमेरिकेच्या परराष्ट्रीय खात्यातर्फे ही योजना आखण्यांत आली आहे.

**गुजराथेंतील सहकारी चळवळ**—गुजराथेंत सहकारी चळवळ चांगली वाढीला लागल्याचें समजतें. गेल्या तीन महिन्यांत त्या प्रांतांत १२५ सहकारी संस्था स्थापन झाल्या त्यांपैकी ६० टक्के संस्था विलीन झालेल्या भागांत स्थापन झाल्या आहेत. आर्थिक अडचणी, महागाई आणि आवश्यक वस्तूंचा तुटवडा इत्यादि कारणांमुळें गुजराथेंत लोकांना सहकारी चळवळीची आवश्यकता वाटूं लागल्याचा अंदाज करण्यांत येत आहे.

**रिक्शावर बंदी**—ता. १ ऑक्टोबर १९५० पासून माणसानें ओढणाऱ्या रिक्शांना बंदी करण्याचें पंजाब सरकारनें ठरविलें आहे. हा हुकूम थंड हवेचीं ठिकाणें सोडून इतर शहरांनाच फक्त लागू करण्यांत येणार आहे. थंड हवेच्या ठिकाणीं दुसरें सोइस्कर वाहन नसल्यानें तेथें मात्र माणसांना रिक्शा ओढण्याची परवानगी देण्यांत येणार आहे.

**भूकंप पीडितांना मदत**—आसाममधील भूकंप पीडितांना मदत करण्यासाठीं ज्या रकमा स्वखुषीनें देण्यांत येतील त्यावर प्राप्ती कर घेतला जाणार नाहीं असें भारत सरकारनें आसाम सरकारला कळविलें आहे.

**सीलोनकडून कर्जाऊ तांदूळ**—सिलोन सरकारनें १०,००० टन तांदूळ भारत सरकारला कर्जाऊ देऊं केला असून भारतानें ही देणगी मान्य केली आहे. हा तांदूळ मुळांत सीलोननें ब्रह्मदेशाकडून आयात केला होता. परंतु भारतांतील अन्नधान्याची टंचाई लक्षांत घेऊन आता तो भारताला पुन्हां निर्यात केला जाणार आहे. भारताला शक्य झाल्याबरोबर इतकाच तांदूळ परत करण्याचें ठरलें आहे.

**मद्रासला तांदुळाचा पुरवठा**—भारत सरकारनें मद्रास सरकारला ह्या वर्षी तांदूळ पुरविण्याचें आश्वासन दिलें होतें. देऊं केलेल्या तांदुळापैकीं ७१ टक्के तांदूळ भारत सरकारनें पुरविला आहे. आतां फक्त ६५,७०० टन तांदूळ पुरवावयाचा उरला आहे. तांदुळाशिवाय १,१५,००० टन गहूं व ७४,००० टन इतर अन्नधान्यें भारत सरकारनें पुरवावयाचीं आहेत.

**बँक नोकरांची परिषद्**—अखिल भारतीय बँक नोकरांची परिषद् ता. २, ३ व ४ सप्टेंबर १९५० रोजीं जालंदर येथें भरणार होती. परंतु ती आतां ३० सप्टेंबरला भरेल असें परिषदेच्या चिटणिसांनीं जाहीर केलें आहे. संस्थेचे अध्यक्ष श्री. टागोर ह्यांनीं बँक नोकरांच्या नुकत्याच जाहीर झालेल्या निवाड्याविषयीं असे उद्गार काढले कीं, ह्या निवाड्यामुळें बँक नोकरांवर फार मोठा अन्याय करण्यांत आला आहे.

**मि. चर्चिल ह्यांच्या आरोपाचा इन्कार**—ब्रिटनमधील एक कंपनी रशियाला रणगाडे तयार करण्याची व दुरुस्त करण्याची यंत्रसामुग्री पुरवीत आहे असा आरोप मि. चर्चिल ह्यांनीं एका भाषणांत केला होता. ह्या आरोपाचा ब्रिटनच्या व्यापार-खात्यातर्फे इन्कार करण्यांत आला आहे. रशियाला युद्धोपयोगी माल न पुरविण्याविषयीं फार दक्षता घेतली जाते असें त्या खात्याच्या मंत्र्यांनीं जाहीर केलें आहे.

**तांदुळाचा तुटवडा पडण्याची शक्यता**—कोरियांतील युद्ध, ब्रह्मदेशांतील अस्थिर परिस्थिती आणि आग्नेय आशियाकडून तांदूळ विकत घेण्याचा जपानचा विचार इत्यादि कारणांमुळें जगभर तांदुळाचा तुटवडा पडण्याची शक्यता उत्पन्न झाली आहे. ह्या परिस्थितीचा विचार करण्यासाठी सिंगापूरला ८ संबंधित राष्ट्रांची एक परिषद् भरविण्यांत आली आहे. परिषदेंत सीलोन, हाँगकाँग, भारत, इंडोनेशिया, मलाया व पाकिस्तान या राष्ट्रांनीं भाग घेतला आहे. परिषदेचें अध्यक्षपद डॉ. विल्यम क्लाइड ह्या ब्रिटिश प्रतिनिधीकडे आहे.

**अमेरिका लोकर साठाविणार**—अमेरिका लवकरच परदेशांतील लोकर मोठ्या प्रमाणांत खरेदी करूं लागेल असा अंदाज आहे. राष्ट्रीय संरक्षणाच्या दृष्टीनें आवश्यक अशा वस्तूंचा साठा करून ठेवण्याच्या धोरणाचा हा एक भाग आहे. सध्यां अमेरिकेच्या जवळ लोकरीचा साठा इतका कमी आहे कीं, सैन्याच्या पोषाखाच्या गरजा त्या साठ्यांतून फक्त दीड वर्षपर्यंतच भागूं शकतील असें समजतें.

**लियाकतअली खान ह्यांचा अमेरिकेचा खर्च**—पाकिस्तानचे पंतप्रधान मि. लियाकतअली खान ह्यांनीं अमेरिकेच्या दौऱ्यावर असतांना २५ लाख रुपये खर्च केले असें समजतें. हा खर्च उधळपट्टीच्या स्वरूपाचा असल्यानें पाकचे अर्थमंत्रि मि. गुलाम महंमद ह्यांनीं तो मंजूर करण्याचें नाकारल्याची बातमी आहे. कांहीं पाकिस्तानी वृत्तपत्रांनीं तर पंतप्रधानांकडून खुलासा केला जावा अशी मागणी केली आहे.

—सर्व प्रांतांतील—
सुती-गरम-रेशमी
—खादीचें माहेरघर—
खादी मन्दिर
२६१, बुधवार पेठ
ढमढेरे बोळाजवळ,
पुणें २.

# अर्थ

बुधवार, ता. १३ सप्टेंबर, १९५०





संस्थापक :
प्रो. वामन गोविंद काळे
संपादक :
श्रीपाद वामन काळे


## रिझर्व्ह बँकेच्या अहवालांतील आर्थिक आढावा

रिझर्व्ह बँकेच्या सेंट्रल बोर्ड ऑफ डायरेक्टर्सचा ३० जून, १९५० अखेरचा अहवाल प्रसिद्ध झाला आहे. त्यावरून असें दिसतें, कीं अहवालाचे वर्षी बँकेस १२ कोटी, ९० लक्ष रुपये उत्पन्न होऊन तिचा खर्च २ कोटी, ९९ लक्ष रुपये झाला. म्हणजे, मध्यवर्ती सरकारला ९ कोटी, ९१ लक्ष रुपये निव्वळ नफा मिळेल. गेल्या वर्षी नफ्याची रक्कम ८ कोटी, ९६ लक्ष रुपये होती.

### परकीय भांडवलाची उद्योगधंद्यांवरील पकड

रिझर्व्ह बँकेनें, भारतांतील परकीयांच्या खासगी गुंतवणुकीचा तपशील मागविला होता, तो एकत्रित करून त्याचा सारांश अहवालांत देण्यांत आला आहे. चौकशीचा समग्र वृत्तांत स्वतंत्रपणें प्रसिद्ध होईलच. ३० जून, १९४८ रोजीं भारतांतील परकीयांची खासगी गुंतवणूक ५९६ कोटी रुपये किंमतीची होती असा अंदाज करण्यांत आला आहे. त्यांपैकी ५१९ कोटी रुपये म्हणजे सुमारें ८७% रक्कम दीर्घ मुदतीच्या औद्योगिक व व्यापारी गुंतवणुकीची होती. बाकीची रक्कम व्यापारी बँकांच्या अल्पकालीन देण्यांबाबतची आहे. दीर्घ मुदतीच्या गुंतवणुकीची छाननी केली, तर असें आढळून येतें, कीं सुमारें ४२१ कोटी रुपयांच्या भांडवलांबरोबर म्हणजे सुमारें ८३% भांडवलाबरोबर परकीयांची व्यवसायांवर पकडहि आलेली आहे. म्हणजे, परकीयांनीं नुसतें व्याजानें भांडवल गुंतवलेलें नसून त्याचेबरोबर त्या भांडवलदारांचा उद्योगधंद्यांवर व्यवस्थेच्या स्वरूपाचा ताबाहि पण आहे. औद्योगिक व व्यापारी स्वरूपाच्या परकीय भांडवलाची त्याच्या मूळ देशवार वाटणी खालीं दिली आहे.

| | कोटी रु. |
|---|---|
| ग्रेट ब्रिटन | ३७६ |
| अमेरिका | ३० |
| पाकिस्तान | २१ |
| ब्रि. वेस्ट इंडीज | १५ |
| स्वित्सरलंड | १० |
| कॅनडा | ९ |

### चलन-विस्तार, महागाई, आयात-निर्गत

चलनविस्तार आणि महागाई ह्यांतून भारताची सुटका होण्यास गेल्या वर्षांतील प्रयत्नांचा विशेष उपयोग झालेला दिसत नाहीं. जून, १९४९ चे मानानें जून, १९५० मध्यें किंमतींचा निर्देशांक ४.६% अधिकच झाला. आर्थिक सल्लागारांचा इंडेक्सचा आकडाहि अशीच वाढ दर्शवितो. ह्या वाढीची गति कमी न होता तिचा वेग अधिकच होत आहे आणि कोरियांतील युद्धामुळें ती गति आवरणें अधिकच अवघड झालें आहे. चलनाच्या पुरवठ्यांत १९४८-४९ मध्यें १३७ कोटी रुपयांची घट झाली होती; १९४९-५० मध्यें चलनांत १६ कोटींची भर पडली. सरकारी खर्चांत काटकसर कितीहि केली, तरी तेवढ्यानें हा प्रश्न समाधानकारक सुटणार नाहीं. व्यापक उपाययोजनाच त्यासाठी कार्यक्षमतेनें अंमलांत आणली गेली पाहिजे.

आयात कमी करून निर्गतीस प्रोत्साहन देण्याचें सरकारी धोरण मात्र बऱ्याच प्रमाणांत यशस्वी झालें. येण्या-देण्यांतील तूट कमी होऊन, स्टर्लिंगच्या वापरांतहि काटकसर होऊं शकली. त्यामुळें, उपलब्ध असलेले ५ कोटी पौंड भारतीयांस वापरता आले नाहींत. चालू वर्षी त्या मानानें आयात अधिक होऊं शकेल. कारण, हे ५ कोटी पौंड ह्या वर्षाच्या हिशेबांतहि ओढण्यांत आले आहेत. आयातविरील निर्बंध थोडेसे सैल होण्याशी ह्या परिस्थितीचा संबंध पोंचतो. इंडस्ट्रिअल फिनॅन्स कॉर्पोरेशनच्या महत्त्वपूर्ण कार्यक्षेत्राचा बँकेच्या अहवालांत उल्लेख करण्यांत आला आहे. त्या कॉर्पोरेशनच्या कार्याचा आणि उद्योगधंद्यांच्या दीर्घकालीन भांडवलविषयक गरजांचा निकट संबंध असल्यानें, त्याचा तपशील स्वतंत्रपणें आम्हीं दिला आहे.

### बँकांवर देखरेख आणि तपासणी

बँकिंग कंपनीज ॲक्टामुळें बँकिंगबाबत रिझर्व्ह बँकेची जबाबदारी पुष्कळच वाढली आहे. देशांतील सर्व बँकांची वारंवार तपासणी करण्याचें रिझर्व्ह बँकेनें योजिलें आहे आणि त्या दिशेनें प्रारंभहि झाला आहे. हिंदी बँकिंगमधील अनिष्ट प्रवृत्तींबाबत चर्चा ह्या पूर्वी अनेकवार झालेली आहे; रिझर्व्ह बँकेच्या अहवालांत तिनें हाच अनुभव नमूद केला आहे. बँका आपले ताळेबंद सजवतात त्यामुळें जनतेची व ठेवीदारांची दिशाभूल होते; ह्या गोष्टीस आळा बसणें जरूर आहे असें रिझर्व्ह बँकेनें स्पष्ट म्हटलें आहे. रिझर्व्ह बँकेचा सल्ला व तिची देखरेख ह्यांचा बँकांच्या व्यवहारावर सुपरिणाम होईल अशी अपेक्षा आहे.

---

## इं. फिनॅन्स कॉर्पोरेशनचें गेल्या वर्षांतील काम

### कर्जविषयक तपशील

| | ३० जून १९५० अखेरचें वर्ष | | ३० जून १९४९ अखेरचें वर्ष | |
|---|---|---|---|---|
| | अर्जांची संख्या | रक्कम (हजार रु.) | अर्जांची संख्या | रक्कम (हजार रु.) |
| आलेले अर्ज | ६५ | ८७५६३ | ९५ | १०३३१८ |
| मंजूर केलेले अर्ज | २३ | ३७७०० | २१ | ३४२२५ |
| नामंजूर केलेले अर्ज | ४४ | ४३०६५ | ३३ | १८८५५ |
| वर्षअखेर विचार चालू असलेले अर्ज | १९ | १८४०० | ४१ | ४८८३८ |
| रद्द ठरविण्यांत आलेले अर्ज | २० | २८,००० | — | —— |

(१९४९-५० चे प्रारंभीं ४१ जुने अर्ज दप्तरांत होते, त्यांत ६५ नवे अर्ज मिळवले म्हणजे एकूण १०६ अर्ज होतात. त्यांची विल्हेवाट कशी लागली, हें वरील तक्ता दर्शवितो.)

### मंजूर रकमांचा तपशील

| उद्योगाचा प्रकार | ३० जून १९५० अखेरच्या वर्षी मंजुरी (हजार रु.) | ३० जून १९४९ अखेरच्या वर्षी मंजुरी हजार रु.) | एकूण |
|---|---|---|---|
| टेक्स्टाईल यंत्रसामुग्री | ८०० | ४३०० | ५१०० |
| मेकॅनिकल इंजिनिअरिंग | ३९०० | १००० | ४९०० |
| इलेक्ट्रिकल इंजिनिअरिंग | ३७५० | २६०० | ६३५० |
| कपास टेक्स्टाइल्स | ९२५० | ४००० | १३,२५० |
| लोकर टेक्स्टाइल्स | —— | ५०० | ५०० |
| रॅयॉन कारखाना | ५००० | —— | ५००० |
| रसायनें | ४०० | ५६५० | ६०५० |
| सिमेंट | —— | ४००० | ४००० |
| सिरॅमिक्स व काच | —— | ६००० | ६००० |
| ऑईल मिल्स | —— | १७५ | १७५ |
| वीज निर्मिती | ९०० | ३०० | १२७० |
| मेटॅलर्जी | —— | ३००० | ३००० |
| लोखंड–पोलाद | २७०० | १५५० | ४२५० |
| ॲल्युमिनिअम | ५००० | —— | ५००० |
| साखर | २००० | —— | २००० |
| खाणी | ३००० | —— | ३००० |
| इतर | १००० | ११५० | २१५० |
| | ३७,७०० | ३४,२२५ | ७१,९२५ |

कार्पोरेशननें मंजूर केलेल्या कर्जांत एका ऊंसकरी लोकांच्या सहकारी सोसायटीस दिलेलें २० लक्ष रुपयांचें कर्ज आहे. ४०० ते ५०० टनांचा साखर कारखाना उभारण्यासाठी ही सोसायटी स्थापन करण्यांत आलेली आहे.

कॉर्पोरेशननें ३० जून, १९५० अखेर, दोन वर्षांत, ७,१९,२५,००० रु. चीं कर्जे मंजूर केलीं त्यांपैकीं ३,४१,७४,३०० रु. चीं कर्जे प्रत्यक्ष उचलण्यांत आलीं आहेत. मंजूर केलेलीं कर्जे व उचलेलीं कर्जे ह्यांत एवढी तफावत पडण्याचें कारण, कर्जदार जरूरीप्रमाणें रकम घेत जातात; एका रकमेनें घेत नाहींत. पुष्कळ वेळा कायदेशीर कागदपत्र पुरे होण्यास वेळ लागतो. कांहीं कारखानदार यंत्रसामुग्रीची किंमत उतरण्याची वाट पहातात. लायसेन्स किंवा परमिट मिळण्यास त्यांना कांहीं वेळा उशीर लागतो.

कपास कापडाच्या गिरण्यांपैकी फारच थोड्या गिरण्यांजवळ ज्यांतून त्यांना सध्याच्या किंमतीनें नवी यंत्रसामुग्री घेतां येईल एवढे पुरेसे रिझर्व्ह आहेत, असें मत कॉर्पोरेशनच्या डायरेक्टरांनीं व्यक्त केलें आहे. इंडस्ट्रिअल कोर्टांनीं जे बोनस देवविले आहेत, त्यांचा मध्यम आकाराच्या गिरण्यांवर अवास्तव ताण पडला आहे, असेंहि त्यांनीं नमूद केलें आहे. एकीकडे बोनसची रकम रोखीनें द्यावी लागली असून दुसरीकडे यंत्रसामुग्री बदलणें तहकूब झालें आहे, खेळतें भांडवल अपुरें पडत आहे, कपास, प्रेरक शक्ती, स्टोर्स, मजुरी ह्यांचा खर्च वाढत चालला आहे.

इंडियन इलेक्ट्रिक ॲक्ट १९१० व इलेक्ट्रिसिटी (सप्लाय) ॲक्ट १९४८ ह्यांतील कांहीं तरतुदींमुळें वीज कंपन्यांना कर्जे देण्यांत कार्पोरेशनला कायदेशीर अडचण येत आहे.

कॉर्पोरेशन कर्जदारांकडून सामान्यतः ५½ % व्याज घेतें. ठरल्या प्रमाणें व्याज व हप्ते दिले तर ½ टक्का रिबेट दिला जातो. म्हणजे, व्याजाचा प्रभावी दर ५ % पडतो.

### रशियाची सबंध जगावर पकड बसण्याची वेळ आली : तोंड देण्याची तयारी करा

"रशिया आपलें लष्करी, आरमारी व वैमानिक सामर्थ्य वाढवीत चालला आहे. त्याचे जवळील ॲटोमिक बॉम्बचा व ते फेकण्याच्या साहित्याचा सांठाहि वाढत आहे. सबंध जगावर पकड बसविण्याची त्याची योजना प्रगति करीत आहे. गेल्या १० वर्षांत कम्युनिस्ट किंवा कम्युनिस्ट नियंत्रणाखालील लोक ह्यांची संख्या १८ कोटींची ८० कोटींवर गेली आहे. जगांतील महत्त्वाच्या सर्व देशांत कम्युनिस्टांची संघटना आहे, ती तेथील लोकशाही राज्यांच्या दिलदारपणाचा फायदा घेत आहे. जागतिक युद्ध सुरू झालें तर ही संघटना लोकशाही राज्यांचे पोटांत खंजीर खुपसल्याविना रहाणार नाहीं. कम्युनिझमचा खंबीरपणें प्रसार करण्यासाठी रशियाबाहेर कोट्यावधी कम्युनिस्ट सुसज्ज आहेत. त्यामुळें स्वतःच्या सैनिकांस न गुंतवितां रशिया लोकशाही राज्यें घायाळ करूं शकतो. आणखी प्रत्यक्ष चढाईची वाट न पहातां, लोकशाही राज्यांनीं तिला तोंड देण्याची आतांपासूनच तयारी केली पाहिजे ":—मि. डब्ल्यु. स्टुअर्ट सिमिंगटन, यु. स्टेट्स नॅ. सि. रिसोर्सेस बोर्डाचे अध्यक्ष.

### घाटांची दुरुस्ती

काशी येथील गंगेचे घाट दुरुस्त करण्यासाठी उत्तर प्रदेश सरकारनें ३ लक्ष रु. खर्च मंजूर केला आहे. गंगा आणि वरुणा ह्यांच्या संगमावरील आदिकेशव घाट हा सर्वांत जुना असून तो आतां बऱ्याच ठिकाणीं पडला आहे. दशाश्वमेध घाटाचीहि तशीच स्थिति झाली आहे.

### को. कंझुमर्स सोसायट्यांची परिषद

मुंबई राज्यांतील सर्व को. कंझुमर्स सोसायट्यांची परिषद मुं. प्रां. स. इन्स्टिट्यूटच्या वतीनें १५ व १६ ऑक्टोबर १९५० ह्या दिवशीं मुंबई येथें भरणार आहे. मद्रासचे सुप्रसिद्ध सहकारी कार्यकर्ते श्री. टी. ए. रामलिंगम चेट्टियार हे अध्यक्षस्थान स्वीकारणार आहेत.


## पुणें सेंट्रल को-ऑपरेटिव्ह बँक लिमिटेड, पुणें

## नोटीस

पुणें सेंट्रल को-ऑपरेटिव्ह बँक लिमिटेडची ३३ वावी वार्षिक साधारण सभा रविवार ता. २४ सप्टेंबर १९५० रोजीं सायंकाळीं ५–३० वा. पुणें येथें नूतन मराठी विद्यालयाचे असेंब्ली हॉलमध्यें भरेल. या सभेंत सन १९४९–५० सालचा वार्षिक अहवाल, ताळेबंद, नफा वाटणी मंजूर करणें, हिशेब तपासनिसाच्या तपासणी यादीचा विचार करणें, पोट नियम नं. ४० (४), ४५, ४६, ५६,५९, ६५ (६) व ७४ यांतील दुरुस्त्या मंजूर करणें, पुढील सालासाठी डायरेक्टर, चेअरमन, व्हाइस चेअरमन निवडणें, हिशेब तपासनीस नेमणें व त्यांचें वेतन ठरवणें, निवडणुकीबाबतच्या नियम नं. २७ च्या दुरुस्तीस मंजुरी देणें व सालाबाद प्रमाणें इतर मामुली विषयांचा विचार करणें वगैरे कामें होतील. डायरेक्टरांची व हिशेब तपासणीस निवडणूक त्याच दिवशीं व त्याच इमारतींत सकाळीं ८–३० ते १२ वा. पर्यंत होईल. तरी सदर निवडणुकी व सभेस सभासदांनीं अगत्य यावें अशी विनंती आहे.

बोर्डाचे हुकुमावरून

पुणें ता. २-९-१९५० — मो. वि. खेड

मॅनेजिंग डायरेक्टर

## भारताचा परराष्ट्रीय व्यापार

### १९४९–५० मधील सुधारणा

मागील कांहीं काल परदेशांबरोबरच्या व्यापारांत भारताला येत असलेल्या प्रतिकूल शिलकींत, गेल्या वर्षांतील (१९४८–४९) आंकड्यांशीं तुलना करतां, १९४९–५० मध्यें बरीच म्हणजे सुमारें १२४ कोटी रु. घट आली आहे असें भारत सरकारच्या आर्थिक सल्लागारांनीं नुकत्याच प्रसिद्ध केलेल्या १९४९–५० भारताच्या परदेशीय व्यापाराच्या समालोचन पत्रिकेंत निवेदन केलें आहे. १९४८–४९ मध्यें २१७·६६ कोटी रुपये प्रतिकूल शिल्लक होती ती समालोचनाच्या वर्षांत कमी होऊन ९३·१८ कोटी रु. झाली. व्यापारी शिलकींत ही सुधारणा घडून येण्यास आयातींवरील निर्बंध, त्याचप्रमाणें अन्नआयातींतील कपात व अवमूल्यनामुळें निर्यातींत झालेली वाढ या गोष्टी कारणीभूत आहेत असें आर्थिक सल्लागार पुढें म्हणतात. अवमूल्यनापूर्वी निर्यातीचें सरासरी मासिक प्रमाण ३४·४० कोटी रु. होतें तें अवमूल्यनानंतर ४७·६८ रु. कोटी झालें. त्याचप्रमाणें ६१·०८ रुपये असलेलें आयातीचें सरासरी मासिक प्रमाण ४१·५८ कोटी रु. पर्यंत खालीं आलें.

डॉलर चलनाच्या देशांबरोबर असलेल्या भारताच्या व्यापारांत ठळक सुधारणा झाली असून प्रतिकूल शिल्लक तर जवळजवळ पूर्णपणें नाहींशी झाली आहे. १९४८–४९ मध्यें प्रतिकूल शिल्लक २७.३० कोटी रु. होती ती केवळ ४८ लक्षांवर आली. या सुधारणेस डॉलर विभागांतून होणाऱ्या आयातींवर घातलेले निर्बंध त्याचप्रमाणें रुपयाच्या अवमूल्यनामुळें निर्यातीस मिळालेली चालना आणि आयातीस बसलेला आळा या गोष्टी कारणीभूत आहेत. अवमूल्यनानंतरच्या काळांत डॉलर चलनाच्या देशांबरोबर व्यापारांतील एक मुख्य वैशिष्ट्य म्हणजे (नोव्हेंबर १९४९ नंतर) तुटीची शिल्लक पूर्णपणें नाहींशी झाली आणि बरीच अनुकूल शिल्लक दिसून येऊं लागली हें होय.

अशा प्रकारची सुधारणा भारताच्या दुर्लभ त्याचप्रमाणें सुलभ चलनाच्या देशांशीं असलेल्या व्यापारांतही दिसून आली आहे. मागील दोन वर्षांतील या देशांबरोबरच्या प्रतिकूल व्यापारी शिलकीचे आंकडे पुढील प्रमाणें आहेत.

| | १९४८-४९ | १९४९-५० |
|---|---|---|
| दुर्लभ चलनाचे देश | २६·८ कोटी | १४·८२ कोटी |
| सुलभ चलनाचे देश | १५८.५४ कोटी | ७६.८५ कोटी |

### अन्न आयातींत कपात

१९४९–५० मध्यें समुद्रमार्गें, त्याचप्रमाणें खुष्कीच्या मार्गानें होणाऱ्या व्यापारासह भारताच्या परदेशीय व्यापाराची एकूण किंमत १,१११.९६ कोटी रु. होती. मागील वर्षांत हाच आंकडा १,१२५.०८ कोटी रु. इतका होता. आयात ६०२.५७ कोटी रु. किंमतीची झाली आणि निर्यात व पुनर्निर्यात अनुक्रमें ४९६·२३ कोटी आणि १३·१६ कोटी रु. किंमतीची झाली. खालील आयातींतील प्रमुख वस्तू आणि त्यांच्या किंमती दिल्या आहेत.

आंकडे कोटी रु. चे आहेत.

| | |
|---|---|
| कडधान्यें व आटा यांसह अन्नधान्यें | १०८·७२ |
| यंत्रसामुग्री व गिरण्यांचें सामान | १०५·५२ |
| कपाशी | ६३·८३ |
| तेलें | ५९·२१ |
| धातू व अशुद्ध धातू | ३१·८८ |

आंकडे कोटी रु. चे आहेत.

| | |
|---|---|
| वाहनें | २३·४६ |
| कच्चा ताग | २१·१७ |
| कापसाचें सूत आणि कापड | १८·४१ |
| रसायनें व औषधें | १६·४४ |
| इतर सुतें व गिरण्यांतील कापड | १६·०६ |
| कटलरी, लोखंडी सामान इत्यादी | १५·८२ |
| विजेचें साहित्य व उपकरणें | १३·०२ |
| रंग | ११·११ |
| फळफळावळ, सुका मेवा व भाजीपाला | ९.९४ |
| कागद, लेखन साहित्य व पेस्टबोर्ड | ९७·७१ |

आयातीच्या आंकड्यांचें पृथक्करण केल्यास विशेषतः कच्चा ताग आणि कडधान्यें व आटा यांसह अन्नधान्यें या दोन वस्तूच प्रस्तुत आयातींत ६९ कोटी रु. ची कपात होण्यास कारणीभूत झाल्या असल्याचें दिसून येईल. कच्च्या तागाची आयात मागील वर्षी ७१·२५ कोटी रु. होती ती १९४९–५० मध्यें २१.१७ झाली आणि कडधान्यें व आटा यांसह अन्नधान्यांची १९४८–४९ मधील १३२·३५ कोटी रु. आयात १९४९–५० मध्यें १०८·७२ कोट रु. पर्यंत खाली आली. याउलट, यंत्रसामुग्री व गिरण्यांचें सामान यांची आयात समालोचनाच्या वर्षांत बरीच म्हणजे १०५.५२ कोटी रु. पर्यंत वाढली. ही आयात १९४८–४९ मधील आयातीहून २४·५६ कोटी रु. नी अधिक आहे.

---


### पुणें शहर म्यु. सर्व्हंटस को. अ. बँक लि.

श्री. गं. का. आगारकर, एल. एस. जी. डी. यांच्या नेतृत्वाखालीं वरील बँकेचें उपयुक्त कार्य उत्कृष्टपणें चालू आहे. अहवालाचे वर्षी कार्यकारी मंडळाची व सल्लागार मंडळाची निवड अविरोध झाली ही गोष्ट विशेष उल्लेखनीय आहे. कॉर्पोरेशनच्या कार्याच्या व्याप दिवसेंदिवस वाढत असल्यामुळें बँकेच्या सभासदांची संख्या (१,४२१) आणखी बरीच वाढेलअसा अंदाज आहे. वर्षअखेर कर्जांत गुंतविलेली रक्कम २,३८,८९८ रु. म्हणजे गतवर्षीपेक्षा सुमारें ५०,००० रु. नीं अधिक आहे. गेल्या सात वर्षांत झाला नाहीं एवढा नफा (४,०२८ रु.) बँकेस अहवालाचे वर्षी झाला. थकबाकीचें प्रमाण ५·८% चें ३·१% वर आलें आहे. कर्ज मागणी पुरवण्यास रक्कम अपुरी पडते, तेव्हा सभासदांनीं आपली बचतीची रक्कम बँकेंत ठेवावी व शेअर्स घेऊन आणि वर्गणीची रक्कम पाठवून सहकाराचें तत्त्व अमलांत आणावें अशी विनंति बोर्डानें सभासदांस केली आहे. वार्षिक सभा १७ सप्टेंबर रोजीं आहे. (चेअरमन: गं. का. आगरकर, सेक्रेटरी : ना. कृ. कुलकर्णी.)

---

### कॉसमॉस को. अर्बन बँक लि.


२,५९० सभासद, १,०६,८०० रु. वसूल भांडवल, ६१,१८३ रु. गंगाजळी, ९,६८,९६५ रु. ठेवी, १२,७४,९६१ रु. खेळतें भांडवल, ६,३४,६८८ रु. सरकारी रोखे, १,४२,२५५ रु. स्थावरावरील कर्जें, २,३७,७६६ रु. अल्पकालीन कर्जें, ४४,८१५ रु. इमारत, १३,४३१ रु. निव्वळ नफा, हे बँकेच्या ताळेबंदांतील प्रमुख आंकडे आहेत. अहवालाचे वर्षी बँकेनें ३,६७,६२१ रु. चीं कर्जें दिलीं व २,४१,०९१ रु. चीं वसूल केलीं. थकबाकीचें प्रमाण आणखी उतरून ४·५% वर आलें आहे. ६½% डिव्हिडंडला ६,४०० रु. लागतील. (चेअरमन: गो. शं. देशमुख, डी. सी. ई., एल्. एस. जी. डी. कार्यवाहः य. श्री. शाळीग्राम)



# देशी धंद्यास उत्तेजन द्या.

१ तांदुळाची गिरणी २ डाळीची गिरणी ३ उसाचे चरक
४ चक्क्या ५ गोल करवत (लाकडें कापण्याकरितां) ६ टूल ग्राइंडर्स
व इतर ओतीव काम तयार करणार.

जी. जी. दांडेकर मशिन
वर्क्स लिमिटेड
भिवंडी जि. ठाणें
व्हाया-कल्याण ( जी. आय. पी. रेल्वे )



# भोर स्टेट बँक लि.

[ स्थापना : १९४४ ]

मुख्य कचेरी:—भोर, जि. पुणें.
शाखाः—पुणें, पाली व शिरवळ.

| | |
|---|---|
| अधिकृत भांडवल | रु. ५,००,००० |
| खपलेलें भांडवल | रु. ५,००,००० |
| वसूल भांडवल | रु. २,५०,००० |
| गंगाजळी व इतर फंडस् | रु. ६९,६०० |

बोर्ड ऑफ डायरेक्टर्स

श्री. म. व्यं. शिंगरे, अध्यक्ष. न. भू. ना. पां. थोपटे, उपाध्यक्ष.
रावसाहेब य. दृ. खोले. श्री. चं. रा. राठी.
श्री. कें. वि. केळकर, एम्. ए., एल्एल्. बी. श्री. बा. ग. धंडुके.

बँकिंगचे सर्व व्यवहार केले जातात.
बँक १ ते ४ वर्षें मुदतीसाठी कायम ठेवी स्वीकारते.
दराबाबत समक्ष चौकशी करावी
पुणें कचेरी:—बुधवार घ. नं. ३६१-६२, पासोड्या विठोबा नजिक. फोन नं. २५७६.
अधिक माहितीसाठी लिहा.
रा. गो. आगाशे, बी. ए. ( ऑ. )
मॅनेजर.

फोनः ३४५१९ तारः SAHYOG

# दि प्रॉव्हिन्शिअल इंडस्ट्रिअल को-ऑपरेटिव्ह असोसिएशन, लि.

९, बेक हाऊस लेन, फोर्ट, मुंबई १.

उत्पादकांच्या ( प्रोड्यूसर्स ) सोसायट्यांना
असोसिएशन खालील मालाचा पुरवठा करतेः—

सूत, रसायनें, रंग, कच्चीं कातडीं व चामडीं,
कातडीं कमाविण्यास लागणारा माल,
कमावलेलें कातडें, इ., मशीन.
टूल्स आणि इक्विपमेंट इ.
आणि
खालील मालाच्या विक्रीस साहाय्य करतेः—

हातमागावरील कापड ( सुती व लोंकरी ), धातूचें सामान, चंदनी लांकूड, रोजवुड आणि हस्तिदंती आर्टस अँड क्रॅफ्टस, रेशीम, जर, कातडीं व कातडी माल, खाद्य तेलें, लाकूड आणि कोळसा वगैरे.

# मशिन्स् रोखीनें व हप्त्यानें विकत मिळतात.



पेडणेकर आणि कं.
लिमिटेड
शिवण्याच्या यंत्रांचे व्यापारी
१७२, गिरगांव रोड, मुंबई नं. ४.
फोन नं.—२१७३८

# दि व्हल्कन इन्शुअरन्स कं. लि.

—पुणें शाखा—
१७९, कर्वे बिल्डिंग, लक्ष्मी रोड.
आग, मोटार, अपघात व वर्कमेन्स कॉंपेन्सेशन ह्यांचे विमे स्वीकारणारी प्रमुख स्वदेशी कंपनी.
एजन्सी व इतर माहितीसाठी चौकशी करा :
ब्रँच सेक्रेटरी.

## बेकारी टाळण्यासाठी कांहीं करतां येण्यासारखें आहे काय ?

( भा. म. का. )

हिंदमध्यें आज बेकार लोकांचा आंकडा वाढत चालला आहे व ही वाढती बेकारी नवीन प्रश्न निर्माण करणार आहे. उत्पादनशक्तीशीं बेकारीचा निकट संबंध येतो. उत्पादनशक्ति पूर्णावस्थेला किंवा निदान योग्य प्रमाणांत असली व त्या मानानें निर्गत व्यापाराची परिस्थिति समाधानकारक असली म्हणजे बेकारी निर्माण होत नाहीं. परंतु सध्यां संप, मंदी, नैसर्गिक आपत्ति इ. गोष्टीमुळें बेकारांच्या संख्येंत भर पडत आहे. अगदीं अल्प प्रमाणांत बेकारी असली तरी त्यामुळें एक प्रकारें देशाच्या अर्थव्यवहारावर सहाजिकच दडपण पडत असतें व त्यामुळें कारखानदार व उत्पादक यांच्या दृष्टीनें मजुरीचे दर किंवा कामगाराच्या वेतनाचे दर कांहीं एका मर्यादेंत रहावयास थोडीशी मदत होते. परंतु ती अजिबात नसेल तर मजूर व कामगार यांची एक प्रकारें मक्तेगिरी निर्माण होऊन त्यामुळें मजुरीवरील खर्च व उत्पादनाचा खर्च यांच्यांत वाढ होण्याला मदत होते.

हिंदमधील आजची बेकारी कोणत्याहि प्रकारें सुस्थितीची निदर्शक नसून आपल्या कमकुवत आर्थिक परिस्थितीची निदर्शक आहे. उत्पादनाला तेजी आणून ही परिस्थिति थोडीशी टाळतां येईल. परंतु गेले दोन महिने कोरियन युद्धामुळें निर्माण झालेली परिस्थिति आज महागाई निर्माण करीत आहे व या कृत्रिम परिस्थितीला तोंड देण्यासाठी हिंद सरकारनें नुकताच वस्तूंच्या किंमती आटोक्यांत राखण्याबद्दल हुकूम काढला आहे. हें सर्व योग्यच आहे. परंतु याचा प्रत्यक्ष आर्थिक व्यवहारांत निश्चित परिणाम दिसून आला तरच त्याचा परिणाम होऊन परिस्थिति सुधारेल. तेव्हां अगदीं शांततेच्या काळाप्रमाणें आवश्यक वस्तूंचे बाजारभाव योग्य पातळीवर राखण्याचे प्रयत्न झाले पाहिजेत. म्हणजे पर्यायानें बेकारी कमी करण्याच्या दृष्टीनें त्यांचा थोडासा उपयोग होईल.

हिंदमध्यें प्रच्छन्न स्वरूपाची बरीचशी बेकारी आहे. ही प्रच्छन्न बेकारी अशी कीं, पुष्कळशा लोकांना त्यांच्या ठिकाणीं कार्य करण्याची शक्ति असूनहि पुरेसें काम मिळत नाहीं. आज भांडवलाची टंचाई असली व पुरेशीं उत्पादनाचीं साधनें हातीं नसलीं तरी बहुजनसमाजापैकीं प्रत्येकाला वाढती बेकारी व वाढती महागाई यांना तोंड द्यावें लागत आहे. ही परिस्थिति सुधारण्यासाठी दुष्काळी परिस्थितीप्रमाणेंच नवीन कामें हातीं घेतलीं पाहिजेत, व अस्तित्वांत असलेले सर्व प्रकारचे कारखाने उत्पादनशक्तीच्या दृष्टीनें जास्तींत जास्त कार्यक्षम करण्याचे प्रयत्न झाले पाहिजेत. सध्यांच्या कठीण परिस्थितीमुळें अशा तऱ्हेच्या योजनेला मानसशास्त्राच्या दृष्टीनेंहि अनुकूल वातावरण निर्माण झालें आहे असें वाटतें.

### विश्वेश्वर अय्या ह्यांचा ९० वा वाढदिवस

सर मोक्षगुंडम विश्वेश्वर अय्या ह्यांच्या वयास १५ सप्टेंबर रोजीं ९० वर्षें पुरीं होत आहेत. अद्यापिहि त्यांची औद्योगीकरणाबाबत कळकळ व उत्साह हीं कायम आहेत आणि त्यासाठी त्यांचा सतत प्रयत्न चालू असतो.

### पोर्टरचा बँक डायरेक्टर झाला.

बंगालचे माजी गव्हर्नर, सर फ्रेड्रिक बरो ह्यांची लॉईड्स् बँकेच्या डॉयरेक्टरचे जागीं नुकतीच निवडणूक झाली आहे. सर फ्रेड्रिक हे प्रारंभीं ग्रेट वेस्टर्न रेल्वेवर पोर्टर म्हणून काम करीत होते. पुढें नॅशनल युनियन ऑफ रेल्वेमेन ह्या मजूर संघाचे ते अध्यक्ष झाले.

**राजस्थानमधील सहकारी संस्था**—राजस्थान सरकारनें येत्या दोन वर्षांत ६,००० सहकारी संस्था स्थापन करण्याचें ठरविलें आहे. हल्लीं राज्यांत २,७०० सहकारी संस्था आहेत. शेतकऱ्यांच्या जीवनाच्या सर्व अंगोपांगांशीं त्या निगडित रहातील.

**राजकन्येसाठी पाकिस्तानी पोपट**—इजिप्तचे राजे फरूक ह्यांच्या बहिणीसाठीं पाकिस्तानांतून नाना प्रकारचे पोपट नुकतेच पाठविण्यांत आले. राजकुमारी फाझिआ ह्यांचा एक खाजगी पक्षीखाना आहे त्यांत ह्या पोपटांची भर घालण्यांत येत आहे. ह्या पोपटांत बोलणारे व न बोलणारे पोपटही आहेत.


### श्रीलक्ष्मी सें. को. बँक लि., फलटण

## प्रकट सूचना

बँकेची वार्षिक साधारण सभा फलटण येथें बँकेच्या कचेरींत शनिवार दि. ३०।९।१९५० या दिवशीं सायंकाळीं ५॥ वा. भरणार असून त्या सभेंत खालील कामांचा विचार होणार आहे:—(१) मागील वा. सा. सभेचें प्रतिवृत्त कायम करणें; (२) तपासणी यादी; (३) संचालक मंडळाचें प्रतिवृत्त, ताळेबंद पत्रकें, नफावाटणी; (४) भागीदारांना द्यावयाचा नफा; (५) पोटनियम दुरुस्त्या; (६) दिलेलें रिबेट; (७) नवीन पोट नियम; (८) हिशेब तपासनीस नेमणें; (९) संचालक, अध्यक्ष व उपाध्यक्ष यांची निवडणूक; (१०) आयत्या वेळचीं कामें.

सभेस सर्व भागीदारांनीं अगत्य येण्यास विनंति आहे.

फलटण — संचालक मंडळाच्या आज्ञेवरून
दि. ६।९।१९५० — श्री. ह. तळवलकर
व्यवस्थापक

### धी बॉम्बे प्रॉव्हिन्शिअल कोऑपरेटिव्ह बँक, लि.

## नोटीस

जाहीर करण्यांत येतें कीं, ह्या बँकेची ३९ वी वार्षिक सर्वसाधारण सभा शनिवार ता. ३० सप्टेंबर १९५० रोजीं दुपारीं ३ वाजतां (स्टॅं. टा.) तिच्या रजिस्टर्ड ऑफिसांत, (सर विठ्ठलदास ठाकरसी मेमेरिअल बिल्डिंग, ९, बेक हाऊस लेन, कोट, मुम्बई) खालील कामाकरतां भरविण्यांत येणार आहे:—

(१) ३० जून १९५० रोजीं संपणाऱ्या वर्षाचे तपासलेले ताळेबंद, नफातोटा पत्रक व डिरेक्टरांचा रिपोर्ट स्वीकारणें.

(२) नफ्याची वांटणी करणें व डिव्हिडंडचा दर ठरविणें.

(३) बोर्ड ठरवील त्या शर्तीवर सावंतवाडी स्टेट बँकेच्या ताळेबंदाप्रमाणे एक चालू संस्था या नात्यानें निघणाऱ्या देण्याघेण्याची जबाबदारी पत्करण्यासाठीं मुंबई सरकारशीं जरूर तो करार करण्याकरतां बोर्डास मुखत्यारी देणें.

(४) ऑडिटर्स नेमून त्यांचें वेतन ठरविणें.

बोर्डाच्या हुकुमावरून

मुम्बई
ता. २६।८।५० — व्ही. पी. वर्दे
ऑ. मॅनेजिंग डायरेक्टर

भागांच्या तबदिलीचें काम (ट्रान्स्फर बुकें) १८ सप्टेंबर १९५० ते ३० सप्टेंबर १९५० पर्यंत (दोन्ही दिवस धरून) बंद राहील.

डिव्हिडंड मंजूर झाल्यास, ता. १४ सप्टेंबर १९५० रोजीं रजिष्टरमध्यें ज्या भागिदारांचीं नांवें दाखल झालेलीं असतील, त्यांना सोमवार ता. १६ ऑक्टोबर १९५० पासून मुम्बई ऑफिसमध्यें त्यांची रक्कम मिळूं शकेल.

### ॲटम बॉंब पडला, तरी बँकांना भीति नाही

ॲटम बॉंबचा न्यूयॉर्क शहरावर हल्ला झाला, तरी तेथील बँकांचे कागदपत्र सुरक्षित रहावे ह्यासाठीं तेथील बँकर्सनीं उपाययोजना सुरू केली आहे. लेजर पुस्तकें व इतर कागदपत्र ह्यांच्या रोजच्या रोज मायक्रोफिल्म घेऊन ठेवण्याचा त्यांचा प्रयत्न आहे. ह्या फिल्म नंतर शहराबाहेर दूर नेऊन सुरक्षित ठेवण्यांत येतील. अशा रीतीनें, रेकॉर्ड दोन ठिकाणीं राहील आणि बँक कचेऱ्या शहरांतून बाहेर हलविणें सोपें होईल. बँकांनीं आपल्या पाच मजली खोल तळघरांतून रोखे, नोटा, सोनें, इत्यादि ठेवलेलें आहे तें हलविण्याचा विचार अद्याप करण्यांत आलेला नाहीं. कारण, हीं तळघरें बॉंब हल्ल्यास दाद देणार नाहींत अशी अपेक्षा आहे.

### डॉक्टरी खर्च मर्यादेंतच आहे

रहाणीचा खर्च वाढत आहे त्यामानानें वैद्यकीय मदतीवर होणारा खर्च वाढत नाहीं, असा अमेरिकेंतील अनुभव आहे. १९३५-३९ च्या मानानें रहाणीचा खर्च ६९% वाढला असला तरी डॉक्टरी खर्च ४५% च वाढला आहे. डाक्टरांची फी ३८%, दंतवैद्यांची फी ५१%, प्रिस्क्रिप्शनचा खर्च ३७% व इस्पितळांचे चार्जेस १२७% वाढले आहेत. तथापि, रोगी पूर्वीपेक्षां कमी दिवस इस्पितळांत रहातो त्यामुळें त्याचें बिल ६७% च अधिक होतें.

### बेंगॉल केमिकल अँड फार्मास्युटिकल वर्क्स लि.

वरील कंपनीला १३ एप्रिल १९५० अखेर संपलेल्या वर्षी १२,७१,१२१ रुपये नफा झाला. कंपनीचें वसूल भांडवल ६५.८७ लक्ष रु. असून रिझर्व्ह व इतर फंड २४ लक्ष रुपयांचे आहेत. आतांपर्यंत ३५.७० लक्ष रु. चा घसारा काढण्यांत आलेला आहे.

### ब्रिटिश बोलपट धंद्याची अवदशा

१९४९ साल ब्रिटिश चित्रपट धंद्यास अतिशय वाईट गेलें. स्टुडिओंतील एक तृतीयांश नोकर बेकार झाले. २४ जून रोजीं ७५२ कलाकार कामावर होते, त्यांची संख्या ३० डिसेंबर रोजीं ९७ पर्यंत उतरली.

### बँकेंतील सर्व कॅश लांबविली

हुगळी बँक लि. च्या वाटगंज शाखत ता. ३० ऑगस्ट रोजीं भर दिवसा दुपारीं १२-३० वाजतां पाच बंगाली तरुण शिरले. त्यांपैकीं एकानें रखवालदारास पिस्तुलानें रोखून धरलें. बाकीच्यांनीं बँकेचे पाच नोकर व बँकेंत आलेले दोन खातेदार ह्यांना दोरांनीं बांधून एका लहान खोलींत कोंडून टाकलें आणि कौंटरचे कप्पे धुंडाळून ५० हजारांची सर्व कॅश लांबविली.

### कागद गिरण्या व त्यांचें उत्पादन

भारतांत एकूण ३० कागद गिरण्या आहेत व त्यांत २१ हजार कामगार काम करतात. त्यापैकीं निम्मे कामगार पश्चिम बंगालमधील गिरण्यांत आहेत. १९४९ मध्यें कागदाचें उत्पादन १,०३,१९४ टन झालें. १९४८ मध्यें तें ९७,९०५ टन झालें होतें.

### दारूचा भरपूर पुरवठा

अमेरिकेंत सध्या साठविलेली व्हिस्की ८ वर्षें पुरेल. जिन, ब्रँडी, रम, ह्यांचाहि पुरवठा असाच भरपूर आहे.


बेडेकर मसाले

Dr. Waman Gopal's Sarsaparilla
Best Blood Purifier

दी भारत इंडस्ट्रिअल बँक लिमिटेड
हेड ऑफिस : पुणें शहर
शाखाः—पुणें लष्कर, बारामती, लोणावळा, श्रीरामपूर (बेलापूर रोड), ओझर (जि. नाशिक)
पे-ऑफिसः—खोपोली (जि. कुलाबा)
श्री. बी. बी. वोळवेकर (अध्यक्ष) | श्री. के. पी. जोशी (उपाध्यक्ष)
अधिकृत भांडवल रु. १५,४३,८१०
विक्री झालेलें भांडवल रु. ७,९३,८१०
वसूल भांडवल रु. ३,९८,२८५
एकूण खेळतें भांडवल ५३ लाखांचे वर
सर्व प्रकारचे बँकिंगचे व्यवहार केले जातात.
श्री. रा. बा. साळवेकर B. A., LL. B.
श्री. नी. ना. क्षीरसागर
मॅनेजिंग डायरेक्टर.

उंची कपडयाचा व स्नानाचा उत्तम साबण निर्मल सोप
दि माणिक सोप वर्क्स, कराड (सातारा)


हें पत्र पुणें, पेठ भांबुर्डा घ. नं. ९१५।१ आर्यभूषण छापखान्यांत केशव गणेश शारंगपाणी यांनीं छापिलें व श्रीपाद वामन काळे, बी. ए. यांनीं 'दुर्गाधिवास', ८२३ शिवाजीनगर (पो. ऑ. डेक्कन जिमखाना) पुणें ४ येथें प्रसिद्ध केलें.